“स्पंदने मनाची मराठी व हिंदी गझलांना- सुरेल नजराणा” या सांगितिक कार्यक्रम आयोजन खर्चास वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.२३६(ई.नं. १६९९०९४)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २७ ऑगस्ट, २०२६.

वाचा :- **१.** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२६/प्र.क्र.२३६ (ई.नं.१६९९०९४) सां.का.४, दि.१५ जुन, २०२६.
२. सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./२६७४, दिनांक १७ ऑगस्ट, २०२६.

प्रस्तावना :

मराठी गझल ही आज रसिकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असून साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात तिचे महत्त्व वाढले आहे. मराठी गझल ही केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून ती भावनांचा, विचारांचा व सामाजिक वास्तवाचा प्रभावी आविष्कार आहे. या पार्श्वभूमीवर स्पंदने मनाची मराठी व हिंदी गझलांचा- सुरेल नजराणा या सांगितिक कार्यक्रम सादर करण्यास व त्यावरील खर्चास उपरोक्त संदर्भ क्र. ०१ वरील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुषंगाने सदर कार्यक्रमावरील आयोजन खर्चास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

“स्पंदने मनाची मराठी व हिंदी गझलांचा- सुरेल नजराणा” या रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे दिनांक १८ जुलै, २०२६ रोजी पार पाडलेल्या सांगितिक कार्यक्रमावरील आयोजन खर्च रुपये ३,५०,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष पन्नास हजार फक्त) इतक्या निधीस या शासन निर्णयान्वये वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर खर्च “मागणी क्र. झेडडी-०२, २२०५, कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती प्रचालन, (०२) राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य कला संस्कृति जतन, संवर्धन विविध महोत्सव तसेच इतर कार्यक्रम (कार्यक्रम) (२२०५ १५०७) - ५० इतर खर्च” या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यात यावा.

०३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर खर्च वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनिमय, दिनांक ११ ऑगस्ट, २०२६, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-३, अ.क्र. ४ परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.५१३/२०२६, व्यय-१५, दिनांक २३ जुलै, २०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९ एप्रिल, २०२६ मधील सर्व परिच्छेद परीशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २०२६०८२७१६१४१७४६४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP SOPAN SOLASE

Digitally signed by DILIP SOPAN SOLASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS,
2.5.4.20=D88CF2A56EDC338F09BD490729979CB0522F3B3817594F767716F4DFF3A1B161, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AF039EE19AAD174683FF6B9738A6D180446F4C40E7376611B216C04C9C67E5AF, cn=DILIP SOPAN SOLASE
Date: 2026.08.27 16:15:16 +05'30'

(दिलीप सो. सोळसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. उप सचिव (सां.का.४) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, पहिला मजला, एम. जी. रोड, मुंबई.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. निवड नस्ती, सां.का.४